महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाटयस्पर्धा
आयोजित करणे या योजनेची सुधारीत
नियमावली तयार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/ प्र.क्र. ३२२/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १३ जानेवारी, २०१५

**प्रस्तावना :-** नाटयकला ही महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय कला असून हौशी नाटयसंस्थाप्रमाणे व्यावसायिक नाटयसंस्थांना उत्तेजन देण्याच्या उद्देशाने सन १९८७ पासून मराठी व्यावसायिक नाटय स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योजना कार्यान्वित होऊन आता २५ वर्षे पूर्ण झाली असून या योजनेच्या नियमावलीत कालानुरुप योग्य ते बदल करणे आवश्यक असल्यामुळे या योजनेच्या नियमावलीत बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** विचारांती या शासन निर्णयान्वये या योजनेचे पुर्वीचे सर्व शासन निर्णय निरसित करुन या योजनेसाठी सदर शासन निर्णयान्वये सुधारीत नियमावली तयार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-अ** मध्ये सुधारीत नियमावली देण्यात आली आहे. सदर नवीन नियमावलीनुसार व्यावसायिक नाटयस्पर्धा योजनेची अंमलबजावणी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून करण्यात येत आहे.

सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी येणा-या खर्चाबाबत सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-ब** नुसार रु.२१,००,०००/- किंवा रु.२४,००,०००/- इतका खर्च करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत. सदर परिशिष्टात नमूद केलेल्या बाबींवरील बाबवार खर्च कमी-जास्त करण्याचे अधिकारदेखील संचालनालयास प्रदान करण्यात येत आहेत. तथापि, आयोजन खर्चात वाढीव खर्च होत असल्यास त्यास शासनाची मान्यता घ्यावी. तसेच प्रतिवर्षी महागाईत होणारी वाढ विचारात घेऊन दर ५ वर्षांनी परिशिष्ट - ब मधील खर्चात वाढ करण्याबाबत पुनर्विलोकन करुन खर्चाबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

तसेच स्पर्धेतील पारितोषिकाच्या रक्कमांसाठी सोबत जोडलेल्या **परिशिष्ट-क** नुसार रु.१७,२५,०००/- इतका खर्च सांस्कृतिक कार्य संचालनालयास परस्पर करण्यास या शासन निर्णयान्वये अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.



Scanned with CamScanner

सदर नाटयस्पर्धा आयोजित करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना प्रदान करण्यात येत आहेत. तसेच यासाठी येणा-या खर्चासंदर्भात संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत दुय्यम अधिका-यास यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, १०२ कला व संस्कृती यांचे प्रचालन, (०२) (०५) व्यावसायिक नाटयस्पर्धा भरविणे (२२०५ १५२५) - ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखालील प्रति आर्थिक वर्षी मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २६२/१४४४, दि.५.८.२०१४ अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८७१/व्यय-१४, दि.१४ नोव्हेंबर, २०१४ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (२ प्रती)
निवड नस्ती, सां.का.४

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/प्र.क्र.३२२/सां.का.४, दि. १३ जानेवारी, २०१५
सोबतचे परिशिष्ट - अ

## महाराष्ट्र राज्य मराठी व्यावसायिक नाटयस्पर्धेचे नियम

**१) जाहिरातीद्वारे अर्ज मागविणे :-** सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत प्रतिवर्षी डिसेंबर महिन्यात व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी संस्थांकडून अर्ज मागविण्यासाठी प्रमुख वृत्तपत्रात व्यापक जाहिरात देण्याची कार्यवाही करावी.

**२) संस्थेने अर्ज सादर करावयाचा कालावधी :-** वृत्तापत्रातील जाहिरातीनुसार नाटयसंस्थांनी डिसेंबर महिन्यात सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे सोबत जोडलेल्या **परिशिष्ट ड** येथील **नमुन्यामध्ये अर्ज सादर करावा**. तसेच अर्जासोबत **परिशिष्ट इ** येथे जोडलेल्या विहित नमुन्यात **प्रतिज्ञापत्र सादर करावे.**

**३) स्पर्धेसाठीचे प्रवेश शुल्क :-** प्रत्येक नाटकासाठी रु. २०००/- प्रवेश शुल्क आकारण्यात येईल व कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.

**४) स्पर्धेसाठी संस्थेच्या नाटकांची संख्या :-** संस्था तिच्या इच्छेनुसार व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी कितीही नाटके पाठवू शकेल. मात्र प्रत्येक नाटय प्रयोगासाठी स्वतंत्र अर्ज करावा लागेल व स्वतंत्र प्रवेशशुल्क भरावे लागेल.

**५) व्यावसायिक नाटय स्पर्धेसाठी अर्ज करणा-या नाटयसंस्थांनी खालील अटी पूर्ण करणे आवश्यक :-**

१. स्पर्धेत भाग घेणारी संस्था ही मराठी व्यावसायिक नाटयनिर्माता संघाची सभासद असणे आवश्यक आहे, तसेच तिने अर्जासोबत ती नाटयनिर्माता संघाची सभासद असल्याचे संघाच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र सादर करावे.

२. संस्थेने अर्ज करण्यापूर्वी एकाच व्यावसायिक नाटकाचे किमान २५ प्रयोग केलेले असावेत. (सदर बाब मराठी व्यावसायिक नाटयनिर्माता संघामार्फत तपासली जाईल व संस्था सदर संघामार्फत अर्ज करताना त्यांनी यापूर्वी किमान २५ व्यावसायिक स्वरुपाचे नाटयप्रयोग केल्याचे प्रमाणपत्र संघामार्फत देण्यात येईल. सदर प्रमाणपत्र संस्थेने अर्जासोबत जोडावे.)

३. स्पर्धेत सादर करण्यात येणा-या नाटकाचा प्रवेश अर्ज भरतेवेळी त्या नाटकाचे पूर्वी किमान १५ नाटयप्रयोग झाले असणे आवश्यक आहे.

४. स्पर्धेसाठी सादर करण्यात येणा-या नाटकाची **नाटयसंहिता पूर्णपणे नवीन असावी**. तसेच अर्जदार संस्थेची स्पर्धेतील नाटकाची संहिता ही नवीन असल्याचे मराठी व्यावसायिक नाटयनिर्माता संघाने प्रमाणित करणे आवश्यक आहे.

**६) स्पर्धा आयोजनाचे वेळापत्रक :-**

१. डिसेंबर महिन्यात वृत्तपत्रात जाहिरात देऊन दि. २० जानेवारीपर्यंत संचालनालयात नाटयसंस्थांकडून अर्ज मागविण्यात येतील.

२. अर्जांची योजनेच्या अटी/शर्तीनुसार छाननी जानेवारी महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

३. प्राथमिक फेरीचे आयोजन फेब्रुवारी व मार्च या महिन्यात करण्यात येईल.



Scanned with CamScanner

४. अंतिम फेरीचे आयोजन एप्रिल महिन्यात करण्यात येईल.
५. पारितोषिक वितरण समारंभ जून/जुलै महिन्यात संपन्न होईल.

**७) स्पर्धेसाठी परिक्षक नेमणे :-**

१. स्पर्धेसाठी परिक्षक नेमण्याचे अधिकार सांस्कृतिक कार्य संचालनालयास देण्यात येत आहेत.

२. परिक्षक निवडीसाठी नाटयक्षेत्रातील तज्ञ व्यक्तीची नेमणूक करताना कागदोपत्री निकष निश्चित करणे शक्य नाही. कारण कलेच्या क्षेत्रात गुणवत्तेचे निकष गणिती भाषेमध्ये मांडता येत नाहीत. त्यामुळे नाटयक्षेत्रातील प्रचलित मान्यवर तज्ञ व्यक्तींपैकी ज्या व्यक्तींना नाटकाच्या सादरीकरणाच्या वेळेस वेळ उपलब्ध आहे, ते स्पर्धेतील नाटकांशी संबंधित नाहीत तसेच ते सदर काम करु इच्छितात या बाबी तपासून संचालनालयाच्या स्तरावरुन योग्य त्या मान्यवरांची नेमणूक परिक्षक म्हणून करण्यात येईल.

३. परिक्षक म्हणून प्राथमिक फेरीसाठी ३ तज्ञांची तसेच अंतिम फेरीसाठी ५ तज्ञांची नियुक्ती केली जाईल. तथापि, प्रत्यक्ष नाटकाच्या सादरीकरणाच्यावेळी परिक्षक काही अत्यावश्यक कारणामुळे ऐनवेळी गैरहजर राहिल्यास २/३ परिक्षकांमार्फत नाटकाचे परिक्षण करण्यात येईल.

४. परिक्षकांची स्पर्धेसाठी नेमणूक केल्यानंतर स्पर्धेतील नाटक पाहण्याचा वेळ सोडून उर्वरित वेळेत परिक्षक त्यांचे काम करण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतील.

५. परिक्षकांनी दिलेला निर्णय हा अंतिम असून त्यामध्ये संचालनालयाच्या स्तरावर अथवा शासन स्तरावर कोणताही फेरफार करण्यात येणार नाही.

**८) परिक्षकांचे मानधन :-** प्राथमिक व अंतिम फेरीत नेमण्यात येणा-या परिक्षकांना प्रत्येक नाटकाच्या परिक्षणासाठी रु.८००/- इतके मानधन देण्यात येईल.

**९) परिक्षकांचा प्रवास व दैनिक भत्ता :-** शासनाने अशासकीय सदस्यांसाठी प्रवासभत्ता व दैनिकभत्ता यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार स्पर्धेतील परिक्षकांना प्रवास व दैनिक भत्त्याची रक्कम अनुज्ञेय राहील.

**९) इतर अन्य नियम :-**

१. स्पर्धेत ज्यांच्या नावे अर्ज पाठविला असेल त्यास बक्षीस दिले जाईल. मात्र अर्जावर निर्मात्याची सही असणे आवश्यक आहे. स्पर्धेसंबंधीचा इतर सर्व पत्रव्यवहार इतरांनी केल्यास तो पत्रव्यवहार निर्मात्याच्या संमतीने केला आहे असे गृहित धरले जाईल.

२. स्पर्धा भरविण्यास कमीत कमी २० प्रवेशिका या नियमावलीच्या निकषानुसार स्पर्धेसाठी पात्र ठरणे आवश्यक.

३. स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे स्वरुप, विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे. नाटकाचे लेखक, भाषांतरीत असल्यास मूळ नाटकांची भाषा,निर्देश करुन कळवावी लागेल. नाटय, कथा,कादंबरी वा इतर अन्य वाङ्मय प्रकारावर आधारीत असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.



Scanned with CamScanner

४. स्पर्धेसाठी सुचविलेले नाटक स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार शासनातर्फे संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राहील. तसेच ज्यांचे अर्ज नाकारण्यात आले त्यांना संचालनालयाने लेखी स्वरुपात ते अमान्य करण्याची कारणे कळवावीत.

५. मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक व नागपूर या पाच शहरांपैकी कुठल्याही एका शहरातील नाटयगृहात, संस्थेने स्वत:च्या खर्चाने त्यांच्या नाटकाचा प्राथमिक फेरीसाठी प्रयोग सादर करावा. प्राथमिक फेरीतील प्रयोगास शासनातर्फे कुठलेही आर्थिक वा अन्य सहाय्य देण्यात येणार नाही. संस्थेमार्फत सादर होणा-या प्राथमिक फेरीतील नाटकाची तारीख सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत परिक्षकांना कळविण्यात येईल व परिक्षक सदर शहरामध्ये नाटकाचे परिक्षण करण्यासाठी हजर राहतील.

६. अंतिम स्पर्धेसाठी १० नाटकांची निवड केली जाईल.

७. अंतिम स्पर्धेत निवड झालेल्या संस्थांना मुंबई येथे अंतिम स्पर्धा झाल्यास रु.३०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल, आणि मुंबई बाहेर स्पर्धा झाल्यास रु.६०,०००/- इतकी रक्कम नाटकाच्या सादरीकरणासाठी देण्यात येईल.

८. अंतिम फेरीच्या वेळी रु. ५० व रु. ३० दराची तिकीटे ठेवण्यात येतील व ती रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात यावी.

९. व्यावसायिक नाटय स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी प्रथम पारितोषिक विजेल्या नाटकांचा प्रयोग सादर करण्यात येईल व त्यासाठी त्यांना नाटक सादरीकरणासाठी मुंबई येथे पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु.३०,०००/- व मुंबई बाहेर पारितोषिक वितरण समारंभ असल्यास रु.६०,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात येईल.

१०. संस्थेचे बँक अकाऊंट आणि पॅनकार्ड असणे गरजेचे आहे. त्याची प्रत अर्जासोबत जोडावी लागेल.

११. व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी अर्ज सादर करणा-या संस्थेच्या खोटया कागदपत्रांबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास याप्रकरणी न्यायालयापुढे उत्तर देण्यास संबंधित संस्था जबाबदार राहील. याप्रकरणी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय अथवा शासन यांची कोणतीही भूमिका नसल्यामुळे न्यायालयीन प्रकरणी याचिकेस उत्तर देण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

Scanned with CamScanner

शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/प्र.क्र.३२२/सां.का.४, दि. १३ जानेवारी, २०१५

सोबतचे परिशिष्ट - ब

## मराठी व्यावसायिक नाटय स्पर्धा आयोजन खर्च

**१) प्राथमिक फेरीचा खर्च :-** प्राथमिक फेरीमध्ये अर्ज केलेल्या नाटयसंस्थापैकी किती नाटके योजनेच्या निकषानुसार पात्र होतात, हे निश्चित नसल्यामुळे नाटकाच्या संख्येनुसार परिक्षक मानधन, परिक्षक प्रवास व निवास खर्च, चहा-अल्पोपहार खर्च व इतर आयोजन खर्च प्रतिवर्षी वेगवेगळा येणार असल्यामुळे अपेक्षित खर्च ठरविता येत नाही. तथापि, यापूर्वीच्या ५ वर्षातील प्राथमिक फेरीतील पात्र ठरणा-या नाटकांची संख्या व आयोजनाचा खर्च याचा अभ्यास करुन प्राथमिक फेरीच्या आयोजनास्तव **रु.२,००,०००/- इतका खर्च मंजूर करण्यात येत आहे.**

**२) अंतिम फेरीचा खर्च**

| अ.क्र. | बाब | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | परिक्षक मानधन (रु.८००/- x ५ परिक्षक x १० नाटके ) | ४०,०००/- |
| २ | परिक्षक प्रवास खर्च | २०,०००/- |
| ३ | चहापान व अल्पोपहार खर्च | ३०,०००/- |
| ४ | बोर्ड, बॅनर, प्रवेशिका, डिझाईन व छपाई खर्च | ३०,०००/- |
| ५ | समन्वयक मानधन | १०,०००/- |
| ६ | वाहन भाडे खर्च | २०,०००/- |
| ७ | तिकिटविक्री मानधन | ६,०००/- |
| ८ | छायाचित्र खर्च | ८,०००/- |
| ९ | उदघाटन व समारोप खर्च | ५,०००/- |
| १० | स्टेशनरी, झेरॉक्स व इतर कार्यालयीन खर्च | २०,०००/- |
| ११ | नाटयगृह भाडे (रु.२०,०००/- x १० दिवस) | २,००,०००/- |
| १२ | इतर अनुषंगिक खर्च | ११,०००/- |
| | **एकूण खर्च** | **४,००,०००/-** |

**३) जाहिरात खर्च :-** स्पर्धेसाठी नाटयसंस्थांकडून अर्ज मागविणे, अंतिम स्पर्धेतील नाटकांच्या तारखा प्रसिध्द करणे व पारितोषिक वितरण समारंभाची जाहिरात देणे यासाठी एकूण **रु.२,००,०००/-**

**४) पारितोषिक वितरण समारंभाचा खर्च :- रु.१०,००,०००/-**

**५) अंतिम स्पर्धेच्या १० नाटकांचा नाटक सादरीकरण खर्च**

३.१) **मुंबईमध्ये** अंतिम स्पर्धा झाल्यास रु.३०,०००/- x १० = **३,००,०००/-**

३.२) **मुंबई बाहेर** अंतिम स्पर्धा झाल्यास रु.६०,०००/- x १० = **६,००,०००/-**

**६) व्यावसायिक नाटयस्पर्धा आयोजनाचा एकूण खर्च**

| अ.क्र | बाब | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | प्राथमिक फेरीचा खर्च | २,००,०००/- |
| २ | अंतिम फेरीचा खर्च | ४,००,०००/- |
| ३ | जाहिरात खर्च | २,००,०००/- |
| ४ | पारितोषिक वितरण समारंभ खर्च | १०,००,०००/- |
| ५ | अंतिम स्पर्धेतील नाटकांच्या सादरीकरणाचा खर्च | ३,००,०००/- किंवा ६,००,०००/- |
| | **एकूण खर्च** | **२१,००,०००/- किंवा २४,००,०००/-** |



Scanned with CamScanner

**शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/प्र.क्र.३२२/सां.का.४, दि. १३ जानेवारी, २०१५**

**सोबतचे परिशिष्ट - क**

**मराठी व्यावसायिक नाटय स्पर्धा पुरस्कारांच्या रक्कमांबाबत.**

| अ. क्र. | पुरस्काराचे नांव | पुरस्काराचे स्वरुप | सन २०११-१२ पर्यंतची पुरस्काराची रक्कम रुपये | सन २०१२-१३ पासून पुरस्काराची वाढीव रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | उत्कृष्ट नाटक | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | ५,००,०००/-<br>३,००,०००/-<br>२,००,०००/- | ५,००,०००/-<br>३,००,०००/-<br>२,००,०००/- |
| २ | उत्कृष्ट दिग्दर्शन | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | २५,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- | ७५,०००/-<br>५०,०००/-<br>२५,०००/- |
| ३ | उत्कृष्ट नाटयलेखन | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | २५,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- | ५०,०००/-<br>३०,०००/-<br>२०,०००/- |
| ४ | उत्कृष्ट प्रकाश | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | १०,०००/-<br>७,०००/-<br>५,०००/- | २०,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- |
| ५ | उत्कृष्ट नेपथ्य | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | १०,०००/-<br>७,०००/-<br>५,०००/- | २०,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- |
| ६ | उत्कृष्ट संगीत / पार्श्वसंगीत | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | १०,०००/-<br>७,०००/-<br>५,०००/- | २०,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- |
| ७ | उत्कृष्ट वेशभूषा | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | १०,०००/-<br>७,०००/-<br>५,०००/- | २०,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- |
| ८ | उत्कृष्ट रंगभूषा | प्रथम<br>द्वितीय<br>तृतीय | १०,०००/-<br>७,०००/-<br>५,०००/- | २०,०००/-<br>१५,०००/-<br>१०,०००/- |
| ९ | वैयक्तिक अभिनयाची पारितोषिके (५ पुरुष / ५ स्त्री) | १५०००x१० | १,५०,०००/- | २,५०,०००/- (२५,०००x१०) |
| **व्यवसायिक नाटय स्पर्धा पुरस्काराची एकूण रक्कम** | | | **१३,६०,०००/-** | **१७,२५,०००/-** |



Scanned with CamScanner

शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/प्र.क्र.३२२/सां.का.४, दि. १३ जानेवारी, २०१५ सोबतचे

## परिशिष्ट - ड

## मराठी व्यावसायिक नाटयस्पर्धेसाठी अर्जाचा नमुना.

| | | |
|---|---|---|
| १ | व्यावसायिक नाटय संस्थेचे नांव | |
| २. | संस्थेचा कायमचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ३. | संस्थेचे बँक खाते क्रमांक, आयएफएससी कोड नं. व पॅनकार्ड क्रमांक यांची छायांकित प्रमाणित प्रत | |
| ४. | संस्थेचे स्थापन वर्ष | |
| ५. | संस्था किती वर्ष अस्तित्वात आहे. | |
| ६. | संस्था व्यावसायिक नाटयनिर्माता संघाची सभासद असल्याचे सदर संघाच्या अध्यक्षांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र. | |
| ७. | संस्थेने किमान एकाच व्यावसायिक नाटकाचे किमान २५ प्रयोग केल्याचे मराठी व्यावसायिक नाटयनिर्माता संघाच्या अध्यक्षाचे प्रमाणपत्र. | |
| ८. | स्पर्धेत सादर करावयाच्या नाटकाचे नांव, लेखकाचे नांव व नाटकाच्या पहिल्या प्रयोगाबाबतची तारीख याबाबतची माहिती. | |
| ९. | संस्था जे नाटक स्पर्धेमध्ये सादर करु इच्छिते त्या नाटकाचे यापूर्वी किमान १५ नाटयप्रयोग झाले असल्याचे पुरावे. | |
| १०. | स्पर्धेतील नाटकाची नाटयसंहिता पूर्णपणे नवीन असल्याबाबतचे मराठी व्यावसायिक नाटयनिर्माता संघाचे प्रमाणपत्र. | |
| ११. | नवीन नाटकाची संहिता ही स्वतंत्र, भाषांतरीत, रुपांतरीत, आधारीत यापैकी काय आहे, याबाबतची माहिती. | |
| १२. | नवीन नाटकाची संहिता भाषांतरीत, रुपांतरीत किंवा आधारीत असल्यास मूळ नाटकाची भाषा व नाटकाकाराचे नांव याबाबतची माहिती. | |
| १३. | नाटकाची संहिता रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाकडून प्रमाणित केल्याचे मंडळाचे प्रमाणपत्र. | |
| १४. | नवीन नाटयसंहिता असलेल्या नाटकाच्या पुस्तकाची/ संहितेची एक सुवाच्च प्रत प्रवेशिकेसोबत पाठवावी लागेल. प्रत सुवाच्च नसल्यास प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही. | |
| १५. | नाटककाराचे / लेखकाचे सदर नाटक स्पर्धेत सादर करण्याबाबत परवानगी देणारे पत्र. | |
| १६. | नाटकातील कलाकारांच्या नावाची पत्त्यासह, भूमिकेसह व दुरध्वनी क्रमांकासह यादी. तसेच दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत आदी तांत्रीक अंगांची जबाबदारी उचलणा-या व्यक्तींची नावे पाठवावी लागतील. | |
| १७. | प्रवेशशुल्क रु.२,०००/- चा धनाकर्ष जोडणे | |
| १८. | स्पर्धेसाठी नाटक मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक व नागपूर या शहरांमध्ये कोणत्या तारखांना सादर करण्यात येईल, याबाबतचा तपशील. | |

नाटयनिर्मात्याची स्वाक्षरी,
संस्थेचा शिक्का.



Scanned with CamScanner

**शासन निर्णय क्र. व्यानास्प २०१२/प्र.क्र.३२२/सां.का.४, दि. १३ जानेवारी, २०१५**
**सोबतचे परिशिष्ट - ई**

**प्रतिज्ञापत्र.**

दिनांक :

**प्रति,**
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

मी, प्रतिज्ञापूर्वक लिहून देतो की, नाटयस्पर्धेतील विहित नमुन्यातील अर्जात सादर केलेली माहिती सत्य व बरोबर आहे. स्पर्धेचे सर्व नियम वाचले असून त्या सर्वांचे पालन करण्यात येईल. राज्य शासनाच्या मराठी व्यावसायिक नाटयस्पर्धेचे नियम आम्हाला बंधनकारक आहेत.

**नाटयनिर्मात्याची स्वाक्षरी.**

**संस्थेचे नांव :-**

**संस्थेचा पत्ता :-**

**दुरध्वनी क्रमांक :-**

**भ्रमणध्वनी क्रमांक :-**

**स्थळ :-**

**दिनांक :-**

Scanned with CamScanner